॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

राष्ट्रीय सेवा योजना NATIONAL SERVICE SCHEME

**Fax : (02462) 215572** **NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT** **website: srtmun.ac.in**

**Phone: (02462) 215246** **E-mail: nss@srtmun.ac.in**

जा.क्र.: रासेयो/२०२३—२४/५२८ दिनांक : १९/०१/२०२४

## परिपत्रक

**प्रति,**
**मा.प्राचार्य/रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी,**
**रा.से.यो. राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये,**
**प्रस्तुत विद्यापीठ.**

विषयः राज्यस्तरीय रचनात्मक कार्य प्रशिक्षण शिबीरासाठी विद्यार्थी पाठविणे बाबत
संदर्भ: राजर्षि शाहु कला, वाणित्य व विज्ञान महाविद्यालय, पारध ता. भोकरदन जि. जालना यांचे पत्र क्र. आरएससीपी/२०२३—२४/२११ दिनांक १६/०१/२०२४.

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्रान्वये राजर्षि शाहु कला, वाणित्य व विज्ञान महाविद्यालय, पारध राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राष्ट्रीय युवा संघटन यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय कार्य शिबीर दिनांक २४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२४ या कालावधीत आयोजित करण्यात आले असून प्रस्तुत विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात येणा—या महाविद्यालयातील १० विद्यार्थी व १० विद्यार्थीनी शिबीरात सहभागासाठी पाठविण्याबाबत कळविले आहे.

तरी त्या अनुषंगाने रा.से.यो. संलग्नित सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, नांदेड, लातूर, परभणी व हिंगोली जिल्हयातून प्रत्येकी ०२ विद्यार्थी व ०२ विद्यार्थीनी राजर्षि शाहु कला, वाणित्य व विज्ञान महाविद्यालय, पारध ता. भोकरदन जि. जालना येथे आयोजित राज्यस्तरीय रचनात्मक कार्य प्रशिक्षण शिबीरासाठी सोबतच्या सहपत्राचे अवलोकन करून दिनांक २० जानेवारी २०२४ पर्यंत पत्राद्वारे अथवा ई—मेलद्वारे नोंदणी करण्यात यावी व सहभागासाठी विद्यार्थी पाठविण्यात यावेत, ही विनंती.

**डॉ.मल्लिकार्जुन करजगी**
**संचालक**
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

प्रत माहितीस्तव:
१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. प्र.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. कुलसचिवांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
४) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तवः
१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर संलग्न भिलदरी बहुउद्देशिय संस्थेचे राजर्षी शाहू
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पारध ता. भोकरदन
जि. जालना राष्ट्रीय सेवा योजना विभाग व
राष्ट्रीय युवा संगठन आयोजीत

# राज्यस्तरीय रचनात्मक कार्य प्रशिक्षण शिबीर दिनांक : २४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२४

मित्र हो,

सस्नेह नमस्कार,

देशात वाढत चाललेल्या धार्मिक, सामाजिक, जातीय तेढ बघता आज देश एका अस्थिर दिशेने वाटचाल करीत आहे. सर्वच क्षेत्रात आज आश्वासक अशी स्थिती राहिलेली नाही याबाबत देशाची युवा शक्ती निष्क्रीय झालेली आहे. सामाजिक जाणीव व संवेदना बोथट होऊन केवळ ही युवा महाशक्ती वेगळाच दिशेन वळविली जात आहे. त्याकरिता युवकांनी खरे रचनात्मक कार्य करून समाजप्रगती, देशोन्नतीसाठी पुढे यावे यासाठी आमच्या महाविद्यालयात राज्यस्तरीय रचनात्मक कार्य प्रशिक्षण शिबिर आयोजीत केले असुन या प्रशिक्षण शिबिरात प्रेरणाताई देसाई (अर्थतज्ञ, मुंबई),प्रा. मॅक्सवेल लोपीस(मुंबई), प्रशांत नागोसे(सेवाग्राम), मनोज ठाकरे (वर्धा) आदी मान्यवर सहभागी होणार आहेत. तरी आपण आपल्या महाविद्यालयातील दोन विद्यार्थी व दोन विद्यार्थीनी यांना या शिबीरासाठी पाठवावे ही नम्र विनंती.

**- आपले विनित -**

| श्री. ज्ञानेश्वर सोनुने | प्रा.अनिल मगर | डॉ.राजाराम डोईफोडे |
|---|---|---|
| राज्य संयोजक | शिबीर संयोजक | प्राचार्य |
| राष्ट्रीय युवा संघटन | राजर्षी शाहू महाविद्यालय,पारध | राजर्षी शाहू महाविद्यालय,पारध |
| मो. न. ९५०३४२२०३०४ | मो. न. ९२८४२२२५६८ | मो. न. ९४२१६५४८२४ |

*** शिबिराचा तपशील ***

**शिबिराचा कालावधी:** २४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२४
**शिवीर स्थळ :** राजर्षी शाहू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पारध ता. भोकरदन जि. जालना
**नाव नोंदणी :** दिनांक २० जानेवारी २०२४ पर्यत पत्र अथवा ई-मेल द्वारे करू शकता
**शिविराचा प्रारंभ :** २४ जानेवारी २०२४ सकाळी १०:०० वाजता
**शिविराचा समारोप :** २८ जानेवारी २०२४ दुपारी ०२: वाजता

*** अन्य सूचना ***

१. शिबिर पुर्ण निवासी असल्याने व दिवसरभर भरगच्च कार्यक्रम असल्याने या काळात नातेवाईकांकडे व अन्य परिचितांकडे जाण्याची अथवा अन्य कारणासाठी बाहेर जाण्यासाठी मोकळा वेळ असणार नाही. तशी परवानगी मागू नये. तसेच शिबिर काळात कोणास भेटण्यास सुध्दा बोलवू नये.
२. शिबिर काळात थंडीचे दिवस असल्यामुळे शिबीरार्थींनी पुरेसे गरम कपडे व पांघरूण, योगासाठी सोबत आसनही आणावी.
३. सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यासाठी आवश्यक ते साहित्य सोबत आणावे.
४. भोजन व निवासाची सर्वसाधरण सोय संयोजनकांच्या वतीने केली जाईल.
५. शिबिराचा समारोप झाल्याशिवाय कुणालाही सहभाग प्रमाणपत्र मिळणार नाही.
६. प्रवास खर्च महाविद्यालयाने करावा.
७. संपर्क डॉ. राजाराम डोईफोडे ९४२१६५४८२४, प्रा. अनिल मगर ९२८४२२२५६८, ज्ञानेश्वर सोनुने ९५०३९२२०३०४

Email Id: rscparadh@rediffmail.com/ rrdoifode@gmail.com
Website: www.rscparadh.org